## प्रेसनोट दि.२३/०६/२०१९
## लष्कर पोलीस स्टेशन
## संशईतरित्या फिरत असलेल्या २०१७ मधील गुन्हयातील आरोपीस केले जेरबंद

दिनांक २०/०६/२०१९ रोजी लष्कर पो. स्टे. तपास पथकातील पो.हवा ५८२६ थिकोळे, पो.हवा.३१२५ शितोळे, पो.शि.९८१५ भोसले, पो.शि.९८२९ धावडे, असे लष्कर पोलीस स्टेशन हद्दीत पेट्रोलिंग करत असताना खान्या मारुती चौक, कॅम्प या ठिकाणी आले असताना, पो.शि.भोसले यांना बातमीदारामार्फत बातमी मिळाली की,एक इसम संशयीतरित्या सोलापुर बाजार या ठिकाणी कॅनॉलचे लगत फिरत आहे. अशी बातमी मिळाल्याने नमुद स्टाफ सदर ठिकाणी जाऊन वर्णनाप्रमाणे खात्री करता, सदरचा इसम पोलीस स्टाफला पाहुन पळुन जाण्याचा प्रयत्न करत असताना त्यास नमुद स्टाफमार्फत थोडयाच अंतरावर ताब्यात घेऊन त्यास त्याचे नाव पत्ता विचारले असता त्याने त्याचे नाव नाव सोनु मनोज शिरसवाल वय-३१ वर्षे, रा.वानवडी पुणे. असे सांगीतले. त्यास स्टाफला पाहुन पळुन जाण्याचे कारण विचारले असता तो उडवा-उडवीचे उत्तरे देऊल लागल्याने त्यास वरील स्टाफच्या मदतीने लष्कर पोलीस स्टेशन येथे आणुन,त्याचेकडे अधिक चौकशी केली असता त्याने वानवडी पोलीस स्टेशन हद्दीत सन २०१७ मध्ये गुन्हा रजि नं. ४५४/२०१७ भा.द.वि.क.३२४,३२३,५०४,३४ हा गुन्हा केल्याचे सांगुन,तो सदरचा गुन्हा दाखल झाल्यापासुन फरार असल्याचे नमुद आरोपीने सांगीतल्याने व सदरच्या गुन्हयाबाबत माहिती घेऊन त्याला ताब्यात घेऊन सदरच्या इसमास पुढील कारवाई कामी वानवडी पोलीस स्टेशन येथे पाठविण्यात आले आहे.

सदरची कामगीरी ही मा.पोलीस उप आयुक्त श्री बच्चन सिंग साो, परि.२ पुणे व मा.सहा.पोलीस आयुक्त प्रीती टिपरे मॅडम लष्कर विभाग, पुणे यांचे मार्गदर्शना खाली व वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री चंद्रकांत भोसले साो, यांचे व पोलीस निरीक्षक, गुन्हे श्रीमती माया देवरे नेतृत्वाखाली तपास पथकाचे वर नमुद कर्मचा-यांनी केलेली आहे.